स्थापना : १९८० रजि.नं.: केपीआर/जी.एन.एल.१३८

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि;

KOLHAPUR DISTRICT URBAN BANKS COOP. ASSOCIATION LTD.

१४५८/बी, जी.एन. चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर-४१६०१२

1458/B, G. N. Chambers, Kolekar Tikati, Mangalwar Peth, Kolhapur-416012.

**Ph.:** 0231-2627307/08, **Off. Email :** kopbankasso@gmail.com **Training Email :** kopbankasso.training@gmail.com **Web.:** kopbankasso.com

Ref. No.: KOPBANKASSO / Date :

जा.क्र.: कोजिनाबँक्सअसो/२०२१-२२/६९ दिनांक : १८ जून, २०२१

प्रति,
**मा. नामदार शामराव उर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील,**
सहकार मंत्री,
महाराष्ट्र राज्य.

**विषय – बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील दुरुस्तीबाबत...**

महोदय,

सर्व प्रथम महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. सहकार मंत्री, मा. सहकार राज्यमंत्री व मा. सहकार आयुक्त सहकार यांचे स्तरावर आपण महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकांच्या असोसिएशन्स, प्रमुख बँकर्स यांची एक ऑनलाईन मिटींग आयोजित केली व बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट सहकारी बँकांना लागू झाल्याने नागरी सहकारी बँकांवर त्याचे परिणाम काय होतील याबद्दलची सर्व बँकांची तसेच या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींची मते जाणून घेतलीत याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व धन्यवाद.

जुन २०२० पासून बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील सुधारणा केंद्र शासनाच्या अध्यादेशाने लागू झाली व सप्टेंबर २०२० मध्ये सदर कायदा पास झाला आहे. याकरीता रिझर्व्ह बँकेने अद्याप कोणतेही निर्देश जारी केलेले नाहीत व यासाठी माजी डेप्युटी गव्हर्नर श्री. एन. एस. विश्वनाथन यांचे अध्यक्षतेखाली माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये एक स्वतंत्र एक्सपर्ट कमिटी गठीत केली असून सदर एक्सपर्ट कमिटीचा अहवाल अद्याप येणे आहे. मल्टीस्टेट को-ऑप. ॲक्ट अंतर्गत सुद्धा या अनुषंगाने कोणताही बदल झालेला नाही. या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनने बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील काही सुधारणे बाबतच्या सूचना सोबत आपले अवलोकनार्थ सादर केल्या आहेत.

तरी सदर सूचना विचारार्थ घेऊन आपले स्तरावर योग्य ती कार्यवाही व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपले विश्वासू,

(अनिल नागराळे) (सीए महेश धर्माधिकारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी उपाध्यक्ष

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

**कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन तर्फे सर्व नागरी सहकारी बँकांचेवतीने सुचवलेले म्हणणे.**

दिनांक २९ सप्टेंबर २०२० रोजी बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील सुधारणां बाबतचा कायदा संसदेमध्ये मंजूर झाला व या बाबतचा शासनाचा अध्यादेश लागू झाला. मात्र सदर कायद्यातील सुधारणा या दिनांक २६ जून २०२० पासून लागू केल्या गेल्या आहेत.

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट हा मुख्यत्वे करून बँकिंग कंपनीज यांच्यासाठी करण्यात आला व प्रामुख्याने कंपनीज ॲक्ट व त्यांचे कामकाज विचारात घेऊन सदर कायदा करण्यात आला होता.

सन १९६५ साली को.ऑपरेटीव्ह बँक्स समाविष्ट करण्यासाठी बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मध्ये कलम ५६ हे समविष्ट केले गेले व त्यांच्यासाठी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या. त्यावेळी देखील सदर कायदा को.ऑपरेटीव्ह बँक्स (नागरी सहकारी बँक्स) यांना जसाचा तसा लागू न करता कलम ५६ हे समाविष्ट करून मर्यादित प्रमाणात या तरतुदी त्यांना लागू केल्या होत्या.

आता नवीन दुरुस्त्या करत असताना सहकारी बँकांचे व्यवस्थापन अधिक चांगल्या पध्दतीने व्हावे व योग्य नियंत्रण त्यांचेवर रहावे यासाठी तसेच ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण व्हावे यासाठी अधिक व्यावसायिकता बँकांमध्ये असावी, भांडवलबाबत ॲक्सेस रहावा, गव्हर्नन्स अधिक चांगल्या प्रकारे असावा व बँकिंग हे भक्कम पायावर केले जावे, हे हेतू त्यामध्ये नमूद केले आहेत.

तसेच कलम ४५ मध्ये ठेवीदार व जनरल पब्लिक यांच्या हितांचे संरक्षण करणे तसेच बँकांच्या योग्य व्यवस्थापनासाठी मोरॅटोरियम न देता बँक व्यवस्थापनात बदल करणे, ताबा घेणे यासाठी सदर बदल करत असल्याचे ही स्टेटमेंट ऑफ ऑब्जेकट्स अँड रिझनस मध्ये स्पष्ट केले आहे.

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट या कायद्यातील बदलांमुळे नागरी सहकारी बँकांवर दूरगामी परिणाम होऊ घातलेले आहेत.

बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट हा महाराष्ट्र सहकारी कायद्यास 'सुपरसीड' करणारा आहे असे सकृतदर्शनी स्पष्ट होत आहे.

पर्यायाने सद्यस्थितीत सदर कायद्यानुसार महाराष्ट्र सहकारी कायद्यात योग्य ते बदल करून घेणे किंवा सदर कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये योग्य ते बदल करण्यासाठी त्यास आव्हान देणे हेच दोन पर्याय उपलब्ध असल्याचे दिसते.

या दोन्ही गोष्टी करण्यास बराच कालावधी जाणार आहे व अशा परिस्थितीत नागरी सहकारी बँकांना एकाच वेळी दोन्ही कायद्यातील पूर्तता करणे हे 'अशक्यप्राय' दिसत आहे. या बाबतीत कायद्याची अंमलबजावणी न झाल्यास 'व्हायोलेशन' चा बडगा रिझर्व्ह बँकेकडून उगारला जाण्याची भिती सर्व नागरी सहकारी बँकांना भेडसावत आहे. व या बाबतीत त्यांच्या (बँकांच्या) हातात या गोष्टी नाहीत ही देखील वस्तुस्थिती आहे.

बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट कलम ५३ मध्ये नमूद केले प्रमाणे या कायद्यातील ज्या तरतुदींचा नागरी सहकारी बँकांवर परिणाम होणार आहे. त्या तरतुदी सध्याच्या कोविड १९ च्या कालखंडात लागू केल्या जाऊ नयेत अशी शिफारस रिझर्व्ह बँकेला केल्यास केंद्र सरकार सहकारी बँकांना या अंमलबजावणीमधून 'एक्झम्प्ट' करू शकेल व त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन, तसेच नॅकफब, तसेच महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशन व महाराष्ट्र अर्बन बँक असोसिएशन यांनी संयुक्तपणे किंवा वैयक्तिक रित्या रिझर्व्ह बँकेला अशी विनंती करावी व त्याप्रमाणे त्यांना शिफारस करणेस सांगावे. असे आमच्या जिल्यातील सर्व नागरी सहकारी बँकांचे म्हणणे आहे.

तसेच महाराष्ट्र सहकार कायदा व बी.आर. अॅक्ट या दोन्ही कायद्यातील तरतुदी या वेगवेगळया असलेने व त्यामुळे नागरी सहकारी बँकांची अडचण होत असलेने महाराष्ट्र शासनाने आपले स्तरावर व रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या एक्स्पर्ट कमिटीपुढे या बाबतचे म्हणणे मांडून दोन्ही कायद्यामध्ये समन्वय राहील असे करावे असेही नागरी सहकारी बँकांचे म्हणणे आहे.

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

वैयक्तिक कलमे ज्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत ती खालीलप्रमाणे आहेत.

**१) कलम ४५ रिझर्व्ह बँकेला सर्व अधिकार**

केंद्रीय अर्थमंत्री मा. निर्मला सीतारामन यांनी बँकांना मॉरेटोरीयम न देता रिस्टक्चर केल्या जाऊ शकतील असे सांगितले आहे. असे करत असताना सहकारी संस्था त्यांची स्वायत्तता "वन मेंबर वन व्होट" ओपन मेंबरशीप इ. बाबत सरकार बदल करणार नाही असे ही त्या म्हणाल्या होत्या. कलम ४५ मधील अधिकारामुळे कोणतीही पूर्व सूचना न देता एखाद्या बँकेच्या ॲमालगमेशन, मर्जर चे अधिकार राहणार असून सहकारी बँकांची "स्वायत्तता" धोक्यात येऊ शकते व त्यामुळे होणाऱ्या घटनात्मक अधिकारावरील अतिक्रमणा बाबतही विचार व्हावा असे वाटते.

**२) कलम १०, १०A, १०B, १०D संचालक मंडळ पात्रता, अपात्रता**

५१% संचालक हे व्यवसायिक पात्रता असणारे पाहिजेत. पण आपल्या सहकार कायद्यात अशी तरतूद नाही. ग्रामीण भागात असे लोक मिळणे कठीण आहे. जास्तीत जास्त ८ वर्षे संचालक पद भूषविता येणार आहे. पण सध्याचे बहुतेक बँकांचे बोर्ड या मुद्यावर Disqualify (अपात्र) होईल. यासाठी सहकारातील निवडणूक कायद्यात ही बदल करावे लागतील. ५ वर्षानंतर तो पुन्हा निवडून आला तर ३ वर्षातच तो Disqualify होईल आणि मग पुन्हा निवडणूक घ्यावी लागेल. ही व्यवहारिक अडचण लक्षात घेणे आवश्यक आहे.

ज्यांना अनुभव आहे ते या निकषावर Disqualify होणार आणि ज्यांना व्यवसायिक अनुभव नाहीच ते Qualify होणारच नाहीत. सहकारी बँकांना संचालक उपलब्ध होणार कसे हा प्रश्न आहे. शिवाय एकूण सहकारी बँकांची संख्या याप्रमाणात संचालकांची संख्या जास्त असणार ही अडचण लक्षात घेणे आवश्यक आहे. आणि आता Professional बोर्ड ऑफ मॅनेजमेंट नेमले जाणारच आहे. तर मग पुन्हा हे बोर्डात वेगळे व्यवसायिक संचालक अशा दुहेरी नेमणुका करणे कशासाठी?

कोणत्याही संचालकाला, बोर्डाला काढून टाकण्याचा अधिकार ही रिझर्व्ह बँकेला आहे. त्याचबरोबर संचालक मंडळ ही बरखास्तीचे अधिकार रिझर्व्ह बँकेला राहणार आहेत. कलम ३६AA नुसार सभासदांचा ज्यांच्यावर विश्वास आहे त्यांना असे disqualify कशासाठी करायचे याचे उत्तर नाही. तसेच संचालक हे पगारी नोकर नाहीत त्यामुळे असे नियंत्रण त्यांच्यावर ठेवण्याची गरज वाटत नाही.

महाराष्ट्र सहकारी कायद्यानुसार शासनाने 'बोर्ड ऑफ मॅनेजमेंट' या प्रोफेशनल मॅनेजमेंट संदर्भातील रिझर्व्ह बँकेने सुचविलेल्या डायरेक्टिव्हज नुसार पोटनियम दुरुस्तीस मंजुरी दिली आहे (काही बँकांचे बाबतीत). तसेच जवळजवळ सर्वच बँकांनी आपल्या संचालक मंडळात तशा शिफारसी करून तो मंजुरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभे पुढे ठेऊन त्याबाबतची मंजुरीही घेऊन पोटनियम दुरुस्तीही केली आहे.

त्यामुळे या 'प्रोफेशनल मॅनेजमेंट' साठी सदर बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मध्ये पुन्हा ५१% संचालकांचे बाबतीत सदर पात्रता आणण्याची आवश्यकताच राहिलेली नाही. 'बोर्ड ऑफ मॅनेजमेंट' हे प्रोफेशनल मॅनेजमेंट करणारच आहे त्यामुळे सदर दुरुस्ती मधून नागरी सहकारी बँकांना कलम ५३ खाली 'एक्झम्पट' केले जावे असे आमच्या जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे मत आहे.

**३) शेअर्स – डिबेंचर्स – बाँड्स १२A, १२(२)**

याबाबतीत शेअर्स मध्ये सध्याची स्थिती कायम रहावी कारण ती सभासदांच्या (जे मालक आहेत ) त्यांच्या सोयीची आहे आणि ती सगळयांच्या अंगवळणी पडलेली आहे. दरवर्षी १०% पेक्षा जास्त भागभांडवल परत करता येणार नाही अशी सध्याच्या सहकार कायद्यात तरतूद आहे आणि ती योग्यच आहे, यात बदल केला जावू नये. ओपन मेंबरशीप – वन मेंबर वन व्होट ही पध्दत कायम राहिली पाहिजे.

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील या बाबतच्या तरतुदी या बँकिंग कंपनीज व कंपनीज ॲक्ट या मधील तरतुदीस अनुसरून असल्याने व सहकारी बँकांचे कायदे व कार्यपद्धती ही कंपनी कायद्यातील तरतुदी पेक्षा खूपच वेगळी असल्याने सहकारी बँकांबाबत सध्याच्या भांडवल विषयक तरतुदी तशाच ठेवल्या जाव्यात व सदर तरतुदी मधून नागरी सहकारी बँकांना कलम ५३ खाली 'एक्झमट' केले जावे असे आमचे मत आहे.

**४) कलम ३० – स्टॅच्युटरी ऑडीटर नेमणूकीस आरबीआयची पूर्व परवानगीची अट – शिथील व्हावी.**

सहकार कायद्यात हा अधिकार सभासदांचा आहे. ते त्यांच्या विश्वासातील ऑडीटर नेमू शकतात. यासाठी आरबीआयने ऑडीटर्स पॅनल तयार करावेत व आरबीआयच्या पॅनेलवरील कोणाचीही नेमणूक करायचा अधिकार बँकेच्या सभासदांना असावा. आरबीआयला जे ऑडीटर्स नको आहेत ते त्यांनी पॅनेल मध्येच ठेवू नयेत, म्हणजे त्यांचा ही उद्देश साध्य होईल व सर्वसाधारण सभेचा पर्यायाने सभासदांचा अधिकार काढून घेतला जाणार नाही. तसेच महाराष्ट्र सहकारी कायद्यानुसार हे अधिकार हे शासनाच्या नियंत्रणाखाली आहेत त्याचेही पालन यामध्ये होऊ शकेल.

ऑडीट कसे करायचे याच्या सूचना ते देतातच शिवाय त्यांचे इन्स्पेक्शन ही असतेच. मग हा पूर्व परवानगीचा अट्टाहास का ? स्थानिक पातळीवरील ऑडीटर्सना बऱ्याच वेळा कर्जदाराबाबत अधिक माहिती असते त्याचा ही फायदा बँकेला होत असतो हेही येथे लक्षात घेणे जरुरीचेआहे.

**५) कलम ४९ C – बायलॉज अमेंडमेंटला ही पूर्व परवानगी आवश्यक –**

पोटनियम करणे हा तर अधिकार सभासदांचा, सर्वसाधारण सभेचा आहे. एखादी पोटनियम दुरुस्ती ही कायदा कानू यातील तरतुदीस अनुसरून असेल तरच ती मंजूर होणार. शासन याची खात्री करणार मग ही आरबीआयच्या पूर्व परवानगीची आवश्यकता का? हा प्रश्न पडतो. पोटनियम दुरुस्ती झाल्यावर मग ती प्रत आरबीआय कडे पाठवली तरी देखील अडचण होणार नाही. व यामध्ये महाराष्ट्र सहकारी कायद्यातील तरतुदीमध्ये तसेच पोटनियमाध्ये बदल करण्याची गरजही उरणार नाही.

या सर्व बाबीसाठी कलम ५३ खाली आरबीआयला या सर्व कलमातून सूट द्यायचे अधिकार कायद्यातच आहेत. राज्य शासनाने या बाबतीत आरबीआय बरोबर, आरबीआयने नेमलेल्या Expert Committee बरोबर चर्चा करणे जरुरीचे आहे व कलम ५३ खाली या सर्व तरतुदीमधून नागरी सहकारी बँकांना वगळणे जरुरीचे आहे.

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

सहकारी संस्था आता वर्ष २०१३ मधील घटना दुरुस्तीमुळे स्वायत्त झाल्या आहेत. माननीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत अभिभाषणात सहकारी बँकांच्या सभासदांचे हक्क काढून घेतले जाणार नाहीत, वन मेंबर वन व्होट ही सहकारी संस्थांची विशेषतः आहे ती कायम राहील तथापि ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कायदा दुरुस्ती असे म्हटले आहे तरी त्यानुसारच कार्यवाही व्हायला हवी.

महाराष्ट्र राज्य हे सहकार क्षेत्रातील सर्वात प्रभावशाली राष्ट्र आहे आणि " सहकार " टिकला पाहिजे असे म्हणत असताना यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींची सर्वात जास्त जबाबदारी महाराष्ट्र राज्याचीच आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनातर्फे आमच्या म्हणण्याची दाखल घ्यावी व नागरी सहकारी बँकांची होणारी अडचण दूर करावी ही विनंती.

(अनिल नागराळे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

(CA Mahesh Dharmadhikari)
(सीए महेश धर्माधिकारी)
उपाध्यक्ष

१४५८ बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर – ४१६०१२
फ़ोन नं. (०२३१) २६२७३०७/०८, ई-मेल : kopbankasso@gmail.com वेबसाईट : kopbankasso.com